शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

हत्तीमहाल, सोमवार पेठ, गंजी गल्ली कोल्हापूर ४१६००२

वेबसाईट www.dydekop.org.in ईमेल dydekop@gm

आरटीई २००९ नुसार इ. ५ वी व इ. ८ वी चे वर्ग जोडणे- परवानगी आदेश

जा.क्र.प्राथ-२/कोवि/आरटीई५वी८वी/पर/१६-१७/ 9402-9521 दिनांक - 17 APR 2017

प्रति,

मुख्याध्यापक

फादर अग्नेल स्कूल,चंदगड,जि.कोल्हापूर

विषय- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ तसेच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मधील तरतूदीनुसार राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना सन २०१५-१६ या वर्षापासून इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे वर्ग स्वयअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास मान्यता देण्याबाबत..

संदर्भ -१. शासन निर्णय क्रमांक:प्रशाव-२०१६/प्र.क्र.११/एसएम-५,दि.२० सप्टेंबर,२०१६.

२. मा.प्राथमिक शिक्षण संचालनालय,म.रा.पुणे यांचेकडील पत्र दि.०३.११.२०१६.

उपरोक्त विषयी आपणास कळविणेत येते की,बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ तसेच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम २०११ मधील तरतुदीनुसार राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना सन २०१५-१६ या वर्षापासून इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे वर्ग जोडण्याबाबतचे प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या शाळेस संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयानुसार इ.५ वी व इ.८ वी चे वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र	शाळेचे नांव व पत्ता	जिल्हा	माध्यम	इयत्ता	मंजूरी वर्ष	शा.नि. अनु. सहपत्र	शेरा
१.	**फादर अग्नेल स्कूल,चंदगड,जि.कोल्हापूर**	**कोल्हापूर**	**इंग्रजी**	**८ वी**	**२०१५-१६**	**इ-१३**	**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर**

१. शाळेला वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

२. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अन्वये शाळांनी भौतिक सोयी सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.

३. तसेच शासन निर्णय दि. २८/८/२०१५ नुसार च्या शासन निर्णयान्वये नैसर्गिक वाढ बंद करणेत आलेली असल्याने इ. ५ वी नंतर तसेच इ. ८ वी नंतर प्रस्तुत शाळांना नैसर्गिक वाढ लागू राहणार नाही.

शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत - शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, **कोल्हापूर** यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

प्रत-अध्यक्ष/सचिव, संबंधित संस्था यांना **फादर अग्नेल स्कूल,चंदगड,जि.कोल्हापूर** मार्फत

प्रत- माहितीस्तव सविनय सादर

मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन मुंबई ३२

मा. आयुक्त, शिक्षण , महाराष्ट्र राज्य, पुणे

मा. शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे